## योजना

**योजनेचे नाव** :- 13 वने 7% वन महसुल अनुदान योजना सन 2024-2025 अंतर्गत **खरीप /रब्बी** हंगामाकरीता 50% सुटीवर कडधान्य बियाणेवर अनुदान देणे.

**तरतुद :- रुपये 5,00,000/- (अक्षरी पाच लक्ष फक्त)**

जिल्हयातील मुख्य पिक भाताचे असुन त्यानंतर कडधान्य पिकाचे क्षेत्र वाढविणे हा या विभागाचा मानस आहे. जिल्हयातील शेतक-यांना दर्जेदार व प्रमाणित बियाणे कमी दरात उपलब्ध करुन देणे डाळवर्गीय पिकाचे पेरणी क्षेत्र वाढविणे हा या योजनेचा मुख्य उददेश आहे.

या योजनेच्या उददेशपुर्ती करीता सन 2024-2025 मध्ये पंचायत समिती मार्फत विक्री होणा-या प्रमाणित व सत्यदर्शक कडधान्य बियाणे शेतक-यांना 13 वने 7% वन महसुल योजने अंतर्गत खरीप/रब्बी हंगामाकरीता 50% सुटीवर अनुदान देण्यात येत आहे.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षात महाबिज मार्फतीने पंचायत समितीला बियाणे पुरवठा करण्यात येईल. पुरवठा झालेले बियाणे विक्री करताना सुटीची रक्कम वजाजाता उर्वरित रक्कम शेतक-या कडुन रोखीन घेण्यात यावी . सदर खर्च हा सन 2024-2025 या वित्तीय वर्षात 13 वने 7% वन महसुल अनुदान अंतर्गत (101-44) कडधान्य बियाणेवर अनुदान देणे लेखाशिर्षकातुन भागविण्यात येईल. पंचायत समिती मार्फत विक्री झालेल्या बियाणेचा अंतिम अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे सादर करतील.

**योजनेच्या अटी व शर्ती**

1) महाबीज /कृषि विद्यापीठ/रा.बि.नि.मार्फतीने पुरवठा होणा-या बियाण्यावर अनुदान देय राहील.
2) वरिल योजनेचा लाभ जंगल व्याप्त क्षेत्रातील गावातील अल्प,अत्यल्प,भुदारक अनुसुचीत जाती/जमाती विमुक्त व भटक्या जाती /जमाती तसेच दारिद्रय रेषेखालील शेतक-यांना आवश्यक दस्ताऐवज प्राप्त करुन देण्यात येईल.
3) कडधान्य बियाणेमध्ये बियाणे महाबिज यांचे दरपत्रकाच्या प्रति क्विंटल याप्रमाणे 50% नुसार अनुदान देय राहिल.
4) एका शेतक-यास जास्तीत जास्त 01 हेक्टर करीता लागणा-या **कडधान्य** बियाण्यावर अनुदान देय राहील.
5) प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर साठापुस्तीके मध्ये नोंद घेवुन नमुना 7/12 वर शेतक-यास बियाणे अनुदानीत दराने वितरीत करावे. त्यांची संपुर्ण जबाबदारी कृषि अधिकारी, विस्तार अधिकारी (कृषि) यांची राहील.
6) पुरवठा संस्थेकडुन पुरवठा झाल्यानंतर देयके प्राप्त करुन घ्यावे व लाभार्थी सहभाग बियाणे वितरणापुर्वी वसुल करुन पुर्ण रक्कमेचा धनादेष महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ चंद्रपुर यांना पाठवावा व तसे कार्यालयास अवगत करावे व वितरण अहवाल या कार्यालयास सादर करावा.
7) अनु.क्र.2 मध्ये नमुद केलेल्या अटीमध्ये जे शेतकरी येत नसतील त्यांना पुर्ण किंमतीवर बियाणे वाटप करावे व याचा हिशोब वेगळा ठेवावा.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली.